ePaper
|| वर्ष - 7 | अंक - 237 || UDYAM-MH-26-0158827 ||
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 6 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मी काय चुकीचं बोललो की हत्या करण्यापर्यंत पोहोचला : जितेंद्र आव्हाड



### आतील पानांत


- रोहित अन् कोहली खेळणार?
- सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम
- ईडीच्या पथकावर बंगालमध्ये हल्ला
- आव्हाडांकडून अजित पवारांना मदत!


## ‘रामराज्य’ हे आमचे स्वप्न;

# राम मंदिर ही आमची अस्मिता!

## » राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भावना



**।पिंपरी ।महाईन्यूज ।।**

**आपले स्वप्न ‘रामराज्य’चे आहे आणि मंदिर ही आमची अस्मिता आहे. श्रीराम मंदिराच्या उभारणीमुळे देशात यापुढे रामराज्याची संकल्पना पहायला मिळेल. समाजातील सोशित, पीडित, वंचित आहे. त्याला ज्या राज्यामध्ये महत्त्व मिळते. त्याचा आवाज ऐकला जातो त्याला ‘रामराज्य’ म्हटले जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे रयतेचे राज्य रामराज्याच्या संकल्पनेतून उभा राहिले होते, अशा भावना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या. लोकनेते आमदार स्व. लक्ष्मण जगताप यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. तसेच, ‘फिरते वाचनालय’ चे लोकार्पणही करण्यात आले. तसेच, प्रभू श्रीराम मंदिराची प्रतिकृती देवून उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.**

यावेळी राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत, पद्मश्री गिरीश प्रभुणे, चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप, भोसरीचे आमदार महेश लांडगे, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, माजी खासदार तथा प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, आमदार भीमराव तापकीर, विश्व हिंदू परिषदेचे दादा वेदक, माजी आमदार जगदीश मुळीक, पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ, माजी महापौर माई ढोरे, उपमहापौर नाणी घुले, माजी राज्यमंत्री तथा प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळा भेगडे, पिंपरी-चिंचवडचे आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते. यावेळी देशात संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी काम करणारी भारतीय विचार साधना संस्थेला मदत म्हणून ‘संस्कारक्षम विचार रथ’ ची चावी अध्यक्ष बिपिन पाटसकर यांना सुपूर्द करण्यात आली. आमदार अश्विनी जगताप म्हणाल्या की, सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी स्वाभिमानाने लढणारे आमदार लक्ष्मण जगताप यांना एका दुर्दर आजाराने आमच्यातून हिरावून घेतले. “गोरगरिब नागरिकांना आरोग्य सुविधा मिळावी. उपचार आणि निदानाअभावी कोणीही नागरिक वंचित राहता कामा नये.” या भावनेतून आम्ही ९ वर्षांपूर्वी ‘अटल महाआरोग्य शिबीर’ या पवित्र कार्याची सुरूवात केली. लाखो लोकांनी आतापर्यंत याचा लाभ घेतला आहे. शहराध्यक्ष शंकर जगताप व स्व. लक्ष्मण जगताप मित्र परिवानाने या शिबिरासाठी प्रचंड मेहनत घेतली आहे. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, २०१७ मध्ये महापालिकेत भाजपा सत्ता आली. पूर्वी वायसीएम महापालिकेत नियमितपणे १ हजारापर्यंत रुग्णांची तपासणी होत असे. मात्र, भाजपाच्या सत्ताकाळात नियमितपणे ५ हजार रुग्णांची तपासणी केली जात आहे. मोठ्या आजारांवर उपचार करण्यासाठी खासगी रुग्णालयात जावे लागते.

### लक्ष्मणभाऊ असते, तर मोठा उत्सव असता

» अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराचे उद्घाटन होत आहे. हे केवळ मंदिर नाही, ५०० वर्षे जो कलंक आमच्या छातीवर उभा केला होता. ज्या कलंकाला १९९२ साली मिटवले. तरीदेखील आमच्या आराध्य दैवताची स्थापना आम्हाला करता आली नव्हती. तिथेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते प्रभूंच्या मंदिराचे लोकार्पण होत आहे. त्यामुळे सर्वत्र मंगलमय वातावरण आहे. आज लोकनेते लक्ष्मण जगताप असते, तर त्यांनीही मोठा उत्सव साजरा केला असता. त्यांचे कार्य सक्षमपणे पुढे नेण्याची शक्ती प्रभू श्रीराम आम्हाला देतील, अशा भावनाही फडणवीस यांनी व्यक्त केल्या.

### वाचाळविरांना प्रभूश्रीरामच सुबुद्धी देतील

» रामराज्याच्या संकल्पनेमुळे काही लोकांना दु:ख होते. त्यामुळे काही वाचाळवीर राम मांसाहारी होते, असे वाचाळ वक्तव्य करतात. आमचे वारकरी, टाळकरी, धारकरी सर्व बहुजन समाज आहे. सगळे शाकाहारी आहेत. त्यामुळे वाचाळवीरांना प्रभू श्रीराम सुबुद्धी देतील. ‘पुरुषार्थ जागृत करुन वाईट प्रवृत्तीवर आपण विजयी मिळवू शकतो’ अर्थात सामान्यांना सोबत घेवून वाईटाशी लढाई करतो. सामान्यांचा पौरुष जागृत करतो. प्रभू श्रीराम लोकनेते लक्ष्मण जगताप यांचे कार्य पुढे नेण्याची शक्ती आम्हाला देतील, असा विश्वासही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

### पहिल्या दिवशी 66 हजार रुग्णांची तपासणी

» भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, शिबिरामध्ये आतापर्यंत ऑनलाईन दीड लाख आणि ऑफलाईन ३७ हजार रुग्णांची नोंद झाली आहे. पहिल्या दिवशी ६६ हजार रुग्णांची तपासणी झाली आहे. सुमारे ६५० लोकांचे एक्स-रे, १९५ सोनोग्राफी, सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांची तपासणी, डायलेसिसच्या सुमारे १ हजार ५०० रुग्णांची तपासणी केली आहे. लोकनेते स्व. लक्ष्मण जगताप यांचा रुग्णसेवेचा वसा आम्ही निरंतरपणे सुरू ठेवणार आहे. स्व. जगताप यांच्याप्रमाणेच जगताप कुटुंबीय भाजपा पक्षनिष्ठा जोपासणार आहे.

“ पिंपरी-चिंचवडच्या विकासात लोकनेते स्व. लक्ष्मण जगताप यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. त्यांनी सुरू केलेला लोकसेवेचा वारसा आम्ही सक्षमपणे पुढे नेण्याचा प्रयत्न जगताप कुटुंबीयांकडून केला जात आहे. प्रगती मोठ्या प्रमाणात होत आहे. त्याच प्रमाणात आरोग्याच्या समस्याही वाढत आहेत. दुर्दर रोगांचा उपचार महाग होत असल्यामुळे विविध तपासण्या आणि उपचार सर्वसामान्य नागरिकांना मिळाले पाहिजेत. या उद्देशाने हे शिबीर आयोजित केले आहे. महाराष्ट्रातल्या प्रत्येक व्यक्तीला ५ लाख रुपयांपर्यंतचा उपचार मोफत मिळाला पाहिजे. यासाठी महात्मा फुले जनआरोग्य योजनेची व्याप्ती वाढवली आहे. सामान्य माणसाच्या गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत.

**- देवेंद्र फडणवीस,** उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

# पुणे मेट्रो मार्गिकांचे विस्तारीकरण लवकरच होणार : अजित पवार

## मेट्रो मार्गिकांचे विस्तारीकरण करण्याची केली सूचना

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील तिन्ही मेट्रो मार्गिकांचे विस्तारीकरण करण्याची अशी सूचना अजित पवार यांनी केली. स्वारगेट-कात्रज आणि पिंपरी-निगडी मेट्रो मार्गिकांच्या विस्तारीकरणासंदर्भात महामेट्रो, राज्य शासन आणि केंद्र सरकार यांच्यात त्रिपक्षीय करार करावा आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मेट्रो मार्गिकांच्या विस्तारीकरणाचा तांत्रिक अहवाल तयार करावा.**

त्यासाठी सल्लागार नियुक्त करावा, असेही पवार यांनी स्पष्ट केले. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाची बैठक झाली. त्या वेळी मेट्रो प्रकल्पाचा आढावा पवार यांनी घेतला. विभागीय आयुक्त सौरभ राव, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, महापालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख या वेळी उपस्थित होते. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मेट्रो मार्गिकांच्या कामांना गती द्यावी, अशी सूचना त्यांनी या वेळी केली. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या मेट्रो मार्गिकांचे विस्तारीकरण करण्याची सूचना त्यांनी केली. वनाज ते रामवाडी या मेट्रो मार्गिकेची प्राथमिक चाचणी





झाली आहे. या मार्गातील दोन ते तीन खांब वाहतुकीच्या दृष्टीने अडचणीचे ठरत आहेत. त्यामुळे अतिरिक्त जमिनीची मागणी महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी केली. त्यासाठी तातडीने जागा द्यावी, अशी सूचना पवार यांनी केली. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्वारगेट ते लोणी काळभोर, हडपसर ते खराडी तसेच रामवाडी ते वाघोली मेट्रो मार्गिकांच्या विस्तारीकरणाचे अहवाल तातडीने करण्यात यावेत, शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो मार्गिकेअंतर्गत राजभवन येथे पादचाऱ्यांसाठी उड्डाणपूल उभारण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले. या सुधारणांनुसार मेट्रो प्रकल्पाच्या सुधारित प्रकल्प किमतीस केंद्रीय नगरविकास विभागाची मान्यता आवश्यक आहे. याबाबत केंद्रीय मंत्र्यांबरोबर चर्चा करून याबाबतच्या अडचणी सोडविण्यात येतील, असे आश्वासन पवार यांनी दिले. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाची बैठक झाली.

### प्रकल्प सनियंत्रण कक्षाची बैठक

» अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाची बैठक झाली. त्या वेळी मेट्रो प्रकल्पाचा आढावा पवार यांनी घेतला. विभागीय आयुक्त सौरभ राव, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, महापालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख या वेळी उपस्थित होते. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मेट्रो मार्गिकांच्या कामांना गती द्यावी, अशी सूचना त्यांनी या वेळी केली. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या मेट्रो मार्गिकांचे विस्तारीकरण करण्याची सूचना त्यांनी केली.

त्या वेळी मेट्रो प्रकल्पाचा आढावा पवार यांनी घेतला. विभागीय आयुक्त सौरभ राव, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, महापालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख या वेळी उपस्थित होते. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मेट्रो मार्गिकांच्या कामांना गती द्यावी, अशी सूचना त्यांनी या वेळी केली. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या मेट्रो मार्गिकांचे विस्तारीकरण करण्याची सूचना त्यांनी केली. वनाज ते रामवाडी या मेट्रो मार्गिकेची प्राथमिक चाचणी झाली आहे. या मार्गातील दोन ते तीन खांब वाहतुकीच्या दृष्टीने अडचणीचे ठरत आहेत. त्यामुळे अतिरिक्त जमिनीची मागणी महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी केली. त्यासाठी तातडीने जागा द्यावी.

# गुंड शरद मोहोळच्या हत्येनंतर देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया

## राज्यात कुठेही टोळीयुद्ध होणार नाही, सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होणार नाही

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोथरुडमधील गुंड शरद मोहोळ याच्यावर गोळीबार करून त्याची हत्या करण्यात आली आहे. यावर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, "या घटनेमुळे राज्यात कुठेही टोळीयुद्ध होणार नाही, तसेच कायदा व सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होणार नाही. सदर कुख्यात गुंडाची हत्या त्याच्याच साथीदारांनी केली आहे. गुंड कुणीही असो, त्याचा बंदोबस्तच शासनाद्वारे केला जातो. त्यामुळे असे टोळीयुद्ध करण्याचा कुणीही प्रयत्न करणार नाही.**

" पुण्यात माध्यमांशी संवाद साधत असताना उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध विषयांवर भाष्य केले. रोहित पवार यांच्या कंपनीवर ईडीने केलेल्या कारवाईबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "विनाकारण स्वतःला शहीद घोषित करण्याचे प्रकार सुरू आहेत. त्यांच्या कंपनीवर छापा पडला अशी माहिती मिळत आहे, त्याच्या खोलात मी गेलेलो नाही. त्यांचा व्यवसाय आहे. व्यवसायात अशा वेगवेगळ्या गोष्टी होत असतात. त्यांनी काही केले नसेल, तर काही होणारही नाही. विनाकारण घाबरण्याची गरज नाही." राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी दोन दिवसांपूर्वी



केलेल्या वादग्रस्त विधानावरही फडणवीस यांनी भाष्य केले. ते म्हणाले, "जितेंद्र आव्हाड यांचे वक्तव्य मुर्खपणाचे होते. 'बदनाम हुए तो क्या हुआ नाम तो हुआ..', अशाप्रकारचा त्यांचा स्वभाग आहे. खरं म्हणजे प्रभू श्रीराम हे सर्वांचेच आहेत. ते बहुजनांचे, अभिजनांचे, आदिवासींचे, दलितांचे अशा सर्वांचेच आहेत. ते शाकाहारी होते की मांसाहारी, या विषयात पडण्याची गरज नाही. ज्यांची प्रभू श्रीरामावर श्रद्धा आहे, अशा लोकांच्या भावनाना दुखावण्याचे काम विनाकारण केले जात आहे. आमचे वारकरी, धारकरी, टाळकरी हे सर्व बहुजन असून ते सर्व शाकाहारी आहेत, या सर्वांचा यातून अपमान नाही का झाला? विनाकारण विवाद निर्माण करून लोकांच्या भावना दुखावून राज्यात अशांतता निर्माण करण्याचे काम केले जात आहे. तसेच जे लोक स्वतःला हिंदुत्ववादी असल्याचे म्हणत होते, त्यांनी साधलेले मौन त्यांची बेगडी वृत्ती दाखवून देत आहे, असा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला. आज, शुक्रवारी, 5 जानेवारी रोजी दुपारी शरद मोहोळ जेव्हा घरातून बाहेर पडला तेव्हा विठ्ठल गांडले, नितीन कानगुडे आणि साहील पोळेकर हे त्याचे साथीदार बॉडीगार्ड म्हणून त्याच्यासोबत चालायला लागले. पण आपले बॉडीगार्डच आपला थोड्याच वेळात शेवट करणार आहेत याची शरद मोहोळला पुसटशी देखील कल्पना नव्हती.

### आरोपी कसे पळून गेले?

» शरद मोहोळला गोळ्या झाडणारे तीन मारेकरी नामदेव कानगुडे या त्यांच्या आणखी एका साथीदारासह सुतारदरा भागातून पळाले. त्यांचे आणखी चार साथीदार त्यांच्यासाठी एक स्विफ्ट कार आणि एक एक्सव्हीयू गाडी घेऊन हजर होते. पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरून या आठ जणांनी साताऱ्याच्या दिशेने वाहनातून पळायचं ठरवल होतं. मात्र त्यांच्या गाड्यांचे नंबर ट्रेस करुन पुणे पोलिसांनी लागलीच त्यांचा पाठलाग सुरु केला आणि शिरवळ जवळ पाठलाग करून आठ जणांना अटक केली.

# शासकीय रुग्णालयांमध्ये आता 'नो रेफरन्स'

## अटल विनामूल्य महाआरोग्य शिबीराचे उद्घाटन : तानाजी सावंत

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयांमध्ये निश्चितपणे दर्जेदार उपचार मिळतात. तिथे काम करणाऱ्या डॉक्टरांची गुणवत्ता खासगी रुग्णालयांपेक्षा चांगली आहे. त्यामुळे सरकारी रुग्णालयांमध्ये कोणताही तज्ञ डॉक्टर रुग्णांना खासगी रुग्णालयांचा 'रेफरन्स' देणार नाही. 'नो रेफरन्स' बाबत धोरणात्मक निर्णय झाला असून, त्याची कडक अंमलबजावणी होणार आहे. कोणी डॉक्टर 'रेफर' करताना अढळ्यास त्याच्यावर कारवाई होईल. रुग्णांना त्याच ठिकाणी उपचार मिळाले पाहिजेत, असा राज्य सरकारचा निर्धार असल्याची माहिती राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी दिली.**




पिंपरी-चिंचवड शहराचे लोकनेते आमदार स्व. लक्ष्मण जगताप यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पुढाकाराने 'अटल महाआरोग्य विनामूल्य शिबीर'चे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन आरोग्यमंत्री डॉ. सावंत यांच्या हस्ते झाले. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, माजी महापौर माई ढोरे, माजी उपमहापौर झामाबाई बारणे, माजी नगरसेवक उषा मुंढे, संतोष कांबळे, शशिकांत कदम, बाबासाहेब त्रिभूवन, शारदा सोनवणे, सविता खुळे, करुणा चिंचवडे, सुरेश भोईर, संदीप कस्पटे, अभिषेक बारणे, सागर आंघोळकर, आरती चोंधे, अंबरनाथ कांबळे, योगिता नागरगोजे, मनिषा पवार, विनायक गायकवाड, हर्षल ढोरे, युवा मोर्चा शहराध्यक्ष तुषार हिंगे, भाजपा सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मडिगेरी, संजय मंगोडेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, माजी स्वीकृत नगरसेवक विठ्ठल भोईर, महेश जगताप, संदीप गाडे, संदीप नखाते, कुणाल लांडगे, विनोद तापकीर, संजय कणसे, शर्मिला पवार, गोपाळ माळेकर, पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्य भारती विनोदे, काळूराम नढे आदी उपस्थित होते. तसेच, महापालिका आयुक्त शेखर सिंह, धर्मादाय आयुक्त महेंद्र महाजन, राष्ट्रीय आरोग्य अभियानचे सहसंचालक राधाकिशन पवार, जिल्हा शल्य चिकित्सक नागनाथ येपल्ले, महापालिका वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई, डॉ. वंदना जोशी, डॉ. विजय वाघ, डॉ. दिपक धोत्रे, डॉ. धर्मेंद्र कुमार, उद्योजक उमेश चांदगुडे, डीपीडीसी सदस्य अप्पा रेणुसे, विश्व हिंदू परिषदेचे दादा वेदक, भा.वी. साचे बिपिन पाटसकर, ह.भ.प. पंकज महाराज गावडे, अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, डॉ. शिवाजी ढगे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते गणेश सहकारी बँकेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच, प्रातिनिधीक स्वरुपात बळीराम महापूरे, दिलीप सोनकांबळे, वाजिद मंडल या दिव्यांग व्यक्तींना साहित्याची मदत करण्यात आली. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, महाराष्ट्रात कॅन्सरचे रुग्ण सर्वाधिक आहेत. त्याचे कारण अशुद्ध पाणी पुरवठा आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने पाणी पुरवठा आणि नदी संवर्धनासाठी पाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची आवश्यकता आहे. अटल महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून अनेक कुटुंबाना धीर देण्याचे काम झाले आहे. ही खऱ्या अर्थाने स्व. लक्ष्मण जगताप यांना श्रद्धांजली ठरली आहे.

महापालिका आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, दिव्यांग व्यक्तींसाठी वर्षभर उपचार सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. केंद्र शासन व राज्य शासनाच्या योजनांची अंमलबजाणी केली आहे. जिजाऊ क्लिनिक सुरू केली आहेत. शहरात १ हजार ५०० हून अधिक वैद्यकीय कर्मचारी नागरी आरोग्यासाठी काम करीत आहोत. नामवंत शासकीय व खासगी हॉस्पिटल्स या शिबिरात सहभागी झाले आहेत. महापालिका प्रशासनाच्या भोसरी, आकुर्डी आणि जिजामाता हॉस्पिटलचा समावेश महात्मा फुले जनआरोग्य योजनेत सहभाग करावा, ज्यामुळे जास्तीत-जास्त रुग्णांना लाभ होईल. महापालिका प्रशासन एकूण अर्थसंकल्पातील १० टक्केहून अधिक निधी आम्ही आरोग्यासाठी खर्च करीत आहोत. थेरगाव येथे पीपीपी तत्त्वार कॅन्सर हॉस्पिटल उभारण्यात येणार आहे.शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, गेल्या ९ वर्षांपासून प्रत्येक वर्षी किमान दीड ते दोन लाख रुग्णांची तपासणी केली जाते. त्याचा फॉलोअप वर्षभर केला जातो. गतवर्षी १५६ लोकांची एंजिओग्राफी केली होती. त्यामध्ये ७६ जणांची एंजिओप्लास्टी मोफत करण्यात आली. 'नो रेफरन्स' बाबत धोरणात्मक निर्णय झाला असून, त्याची कडक अंमलबजावणी होणार आहे. कोणी डॉक्टर 'रेफर' करताना अढळ्यास त्याच्यावर कारवाई होईल. रुग्णांना त्याच ठिकाणी उपचार मिळाले पाहिजेत, असा राज्य सरकारचा निर्धार असल्याची माहिती राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी दिली.

> महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ आणि संशोधन केंद्रांनी शेतकऱ्यांचे नैसर्गिक शेती करण्याबाबत जागृती करावी. रासायनिक खतांच्या वापरामुळे कॅन्सरसारख्या आजाराचे प्रमाण वाढले आहे. केवळ प्रशासनावर अवलंबून न राहात ग्रामपंचातीचा सरपंचापासून प्रत्येकाची जबाबदारी आहे. पाणी प्रदूषण, जमीन प्रदूषणासाठी रोखण्यासाठी प्रशासन, सरकार आणि लोकांनी एकत्रित प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.
>
> **- डॉ. तानाजी सावंत,** आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य.

### शिबिर लक्ष्मणभाऊंना समर्पित

» अपाय होण्याआधीच उपाय व्हावा... या संकल्पनेतून लोकनेते स्व. लक्ष्मण जगताप यांनी अटल महाआरोग्य विनामूल्य शिबिराची सुरूवात ९ वर्षांपूर्वी सुरू केली. कोविड काळात हजारो लोकांना आम्ही मदत केली आहे. आरोग्य शिबीर हे लोकनेते जगताप यांना आम्ही समर्पित करीत आहोत, असे आमदार अश्विनी जगताप म्हणाल्या.

### नागरिकाला मोफत उपचार

» शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, गेल्या ९ वर्षांपासून प्रत्येक वर्षी किमान दीड ते दोन लाख रुग्णांची तपासणी केली जाते. त्याचा फॉलोअप वर्षभर केला जातो. गतवर्षी १५६ लोकांची एंजिओग्राफी केली होती. त्यामध्ये ७६ जणांची एंजिओप्लास्टी मोफत करण्यात आली. दिव्यांगांसाठी मोफत जयपूर फूट, चष्मे, कान-नाक-घसा तपासणी यासह बहुतेक आजारांसाठी मोफत तपासणी व उपचार दिले जातात. गतवर्षी १७ कॅन्सर रुग्णांना मोठ्या रुग्णालयांमध्ये मोफत उपचार दिली. १५० हून अधिक रुग्णालये आणि सुमारे २ हजार डॉक्टर यंदा शिबिरासाठी काम करणार आहेत. यावर्षी मोफत एक्स-रे, सोनोग्राफी, रक्ताच्या सुमारे १६० चाचण्या मोफत होणार आहेत. सुमारे ५ हजार लोकांचा डायलेसिस करण्याचा नियोजन केले आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही रुग्णाला मोफत उपचार मिळणार आहे.

# संप सुटला, समस्येचं काय?




**ट्रकचालकांचा संप सुरू झाला आणि नव्या हिट अँड रन तरतुदींची चर्चा सुरू झाली. ट्रकचालकांच्या या संपामुळे लोकांच्या मनात अर्थातच त्यांच्याविरोधात असंतोष उसळला. याबाबत माझा अभ्यास काही वेगळंच सांगतो. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात रस्ते अपघातांचा मुद्दा मांडताना मी काही आकडेवारीही दिली होती.**

२०१६ पासून २०२२ पर्यंत या आकडेवारीत सातत्याने वाढ झाली आहे. २०२२ मध्ये राज्यातील ३३ हजारांपेक्षा जास्त अपघातांमध्ये १५ हजारांपेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला. देशपातळीवर हा आकडा आणखी प्रचंड आहे. विधान परिषदेतल्या भाषणात मी मांडलेला एक मुद्दा होता पोलिसांसह आरटीओच्या कार्यपद्धतीचा! परवा नाशिकहून मुंबईला येताना ठाणे जिल्ह्याची हद्द जिथे सुरू होते, तिथला ठाणे ग्रामीण पोलिसांनी उभारलेला एक चेकनाका दिसला. महामार्गावरील वळणांवर, उतारांवर नियम तोडणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईसाठी दडून बसलेल्या पोलीस व आरटीओ कर्मचाऱ्यांमुळे अपघात होतात. अद्याप या चेकनाक्यावर अपघात झालेला नाही किंवा झाला असला, तरी त्याला तशी प्रसिद्धी मिळाली नाही. पण समृद्धी महामार्गावर आरटीओमुळे झालेल्या अपघाताची घटना ताजी



आहे. मग अशा घटना घडल्यावर त्याला तो वाहनचालक जबाबदार आहे, असं आपण ठोसपणे कसं म्हणणार? ती जबाबदारी वाहतूक पोलिसांची, आरटीओचीदेखील नाही का? अर्थात रस्ते अपघातांसाठी पोलिसांचा अचानक हस्तक्षेप हे एकमेव कारण नाही. वाहतुकीचे नियम तोडणे, हे सर्वात महत्त्वाचं कारण असतं. त्यातही वाहनं वेगमर्यादेपेक्षा जास्त वेगाने चालवणं, मद्य किंवा अमली पदार्थाच्या अमलाखाली गाडी चालवणं, चुकीच्या बाजूने गाडी चालवणं, सिग्नल तोडणं किंवा मोबाइल फोनवर बोलत वाहन चालवणं हे काही नेहमी मोडले जाणारे नियम आहेत. त्यामुळे होणाऱ्या अपघातांची आणि त्यात मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. आपल्याकडे सिग्नल यंत्रणा बसवण्याचं काम त्या-त्या शहरातील स्थानिक स्वराज्य संस्था करते. पण ती यंत्रणा चालवण्याचं आणि देखरेखीचं काम वाहतूक पोलिसांकडे असतं. प्रगत देशांमध्ये इंटिग्रेटेड सिग्नल प्रणाली कधीच लागू झाली होती. आता त्या देशांनी 'एआय' म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करत सिग्नल यंत्रणा अधिक सक्षमपणे राबवायला सुरुवात केली आहे. आपल्याकडे अजूनही पालिका आणि वाहतूक पोलीस यांच्यात एकवाक्यता नसल्याने असलेली सिग्नल यंत्रणा प्रभावीपणे काम करत नसल्याचं चित्र आहे. वाहनचालकांविरोधात कठोर कायदे असू नयेत, असं माझं मत बिलकूल नाही. पण फक्त कठोर कायदे करून हा प्रश्न सुटणार नाही, असं मला वाटतं. हा गुंता सोडवण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणं गरजेचं आहे. यात सरकारबरोबरच जनसामान्यांनीही त्यांचा वाटा उचलणं गरजेचं आहे. याबाबत इतर देशांमध्ये वाहन कायद्यांची काय परिस्थिती आहे, त्यावर एक नजर टाकू या. अमेरिका, युरोप किंवा ऑस्ट्रेलिया अशा प्रगत देशांमध्ये मोटार चालवण्याचा परवाना मिळवण्याची प्रक्रिया क्लिष्ट असते. तिथेही १६ ते १८ या वयात लायसन्स देतात. पण त्यासाठी तिथल्या उमेदवारांना कठोर लेखी परीक्षा द्यावी लागते. त्याशिवाय मोटार वाहन कायद्यांमधील नियमांचा अभ्यास करावा लागतो. ही प्रक्रिया आपल्याकडेही आहे. पण त्या देशांमध्ये ती खूप काटेकोरपणे पाळली जाते. साधं उदाहरण देतो. अमेरिकेत गेलो होतो, तेव्हा कॅलिफोर्नियातल्या एका छोटया गावात होतो. तिथे झेब्रा क्रॉसिंग सोडून इतर ठिकाणाहून कोणीच कधीच रस्ता ओलांडत नाही, ही गोष्ट मला माहीत होती. मी माझ्या मुलीचा हात धरून फुटपाथवर थांबलो होतो. दोन-तीन गाडया येत होत्या. त्या गेल्या की, रस्ता ओलांडू, असा विचार करून मी उभा होतो. त्या दोन गाडया आल्या आणि झेब्रा क्रॉसिंगच्या आधी थांबल्या. वाहनचालकाने आतूनच मला रस्ता ओलांडण्याची खूण केली. या देशांमध्ये पायी चालणाऱ्यांना प्रथम प्राधान्य असते. लाल सिग्नल असेल, तर निमूटपणे थांबतात. लहान लहान मुलं तर सोडा, मी त्या देशांमध्ये पाळीव कुत्रेही निमूटपणे सिग्नल हिरवा होण्याची वाट बघत थांबलेले बघितले आहेत.

## संपादकीय »

### 'बाबू'काल!


***सर्व महापालिकांचा कारभार लोकप्रतिनिधींच्या हातून सरकारी सेवकांहाती गेला तरी त्याचे कोणास काही वाटत असल्याचे चित्र नाही.***

नव्या वर्षांत महाराष्ट्रात एक नवाच विक्रम रचला जात असल्याचे दिसते. तीन दिवसांपूर्वी १ जानेवारीस २०२४ हे नवे वर्ष सुरू झाले आणि त्या मुहूर्तावर राज्यातील सर्व शहरे 'लोकप्रतिनिधी मुक्त' झाली. गेल्या वर्षांच्या अखेरच्या सप्ताहात राज्यातील शेवटच्या लोकप्रतिनिधींचा समावेश असलेल्या दोन महापालिका आचके देत लोकशाहीपासून मुक्त झाल्या. म्हणजे त्या महापालिकांवरही राज्य सरकारने प्रशासक नेमले. या बाबत सर्वकालीन सत्य म्हणजे हे असे प्रशासक हे सर्वसाधारणपणे त्यांस नेमणाऱ्यांच्या हातचे बाहुले असतात. ती तशी व्हावी ही सर्वपक्षीय सत्ताधाऱ्यांचीही इच्छा नाही. असे असल्यामुळे राज्यातील सर्वच्या सर्व, म्हणजे जवळपास दोन डझनांहून अधिक महापालिकांचा कारभार लोकांतून निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या हातून मंत्रालयांतून नेमल्या जाणाऱ्या सरकारी सेवकांहाती गेला तरी त्याचे कोणास काही वाटत असल्याचे चित्र नाही.

**अदानी-हिंडेनबर्ग वादंगाला वर्ष उलटण्याआधी त्यावर पडदा टाकणारा निकाल सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी दिला. न्यायालयाच्या बाजूने हे प्रकरण आता संपले आहे. हे अशासाठी म्हणायचे की, देशाच्या भांडवली बाजाराची नियामक असणाऱ्या 'भारतीय रोखे व विनिमय मंडळ' म्हणजे 'सेबी'च्या नियमन अधिकार क्षेत्रात येणारे हे प्रकरण आहे.**

## शेवट की नव्याची सुरुवात?

अदानींवरील आरोपांची चौकशी पूर्ण करण्याला मुभा दिली जावी, असे सर्वोच्च न्यायालयाचे हे ४२ पानी निकालपत्र म्हणते. त्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) अथवा केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) या सारख्या यंत्रणांकडे तपास सोपवण्याची गरजच नाही. उलट 'सेबी'नेच जी काही प्रलंबित चौकशी आहे ती तीन महिन्यांच्या मुदतीत पूर्ण करावी, सर्वोच्च न्यायालयाच्या बुधवारच्या निकालपत्राचा सारांशाने हा अन्वयार्थ आहे. तरीही नेहमीच्या खाक्याप्रमाणे न्यायालयाचा हा निकाल म्हणजे अदानी समूहाला दिलासाच असल्याचा भांडवली बाजाराचा आव दिसून आला. खूप लवकर आणि अतिरंजितही म्हटली जावी, अशी प्रतिक्रिया देणे हा भांडवली बाजाराचा स्वभावधर्मच आहे. म्हणूनच निकाल येण्याआधीच अदानींच्या समभागांमध्ये मूल्य तेजीही मग ओघानेच दिसून आली. तर्कशुद्ध आधार नाही अशी वर्तणूक हेच भांडवली बाजाराचे व्यवच्छेदक वैशिष्टया आणि त्याबद्दल



आश्चर्य करण्याचे कारण नाही. तरीही गेले वर्षभर या समूहाबाबत आणि त्यांच्या कंपन्यांत आस्थेने गुंतवणूक कायम राखलेल्या भागधारकांसाठी ही निश्चितच आश्वासक बाब ठरली असेल. खरा प्रश्न, 'अदानीविरोधक बघा कसे तोंडावर आपटले?' असे या निमित्ताने सुरू झालेल्या समाज-माध्यमी सवंगतेचा आहे. हे अदानीविरोधक म्हणजे एकजात सारे 'मोदीविरोधक'च अशा गृहीतकालाच नकळत हवा देणारे हे वर्तन खरे तर ! वस्तुत: हिंडेनबर्ग रिसर्च या अमेरिकी संस्थेचा गेल्या वर्षी २४ जानेवारीला प्रकाशात आलेला अहवाल म्हणजे अदानी समूहासंबंधाने सर्व ज्ञात आरोप, तपासाधीन अथवा चौकशी पूर्ण झालेली गैरव्यवहाराची जी प्रकरणे होती त्याची एकत्रित जंत्रीच होता. कुटुंब आणि सहकाऱ्यांशी संलग्न मॉरिशस, दुबई व विदेशातील अन्य ठिकाणच्या ३८ 'शेल' कंपन्यांमार्फत गुंतवणुकीने, समूहातील कंपन्यांच्या समभागांचे मूल्य वाजवीपेक्षा कैकपट जास्त फुगवले गेले, हा हिंडेनबर्गचा मुख्य आरोप. प्रवर्तक गटाची कंपनीतील भागभांडवली मालकी ७५ टक्क्यांच्या मर्यादेचा भंग करणारी ठरली. शिवाय मॉरिशस, दुबईतील ज्या कंपन्यांतून अदानींच्या समभागांत गुंतवणूक झाली त्या कंपन्यांची मालकी अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांचेच ज्येष्ठ बंधू विनोद अदानी यांच्याकडे अथवा त्यांच्या व्यावसायिक भागीदारांकडे होती. असा अधिक टोकदार आरोप ऑगस्टमध्ये 'ओसीसीआरपी' या शोध पत्रकारांच्या जागतिक समूहाने केला. नव्याने झालेल्या आरोपांनी, अदानींच्या कंपन्यांकडून सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट्स (नियमन) नियम १९५७ चा 'नियम १९अ'चे उल्लंघन आणि या कायद्याचे अनुपालन होते की नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ‘मी तर ‘रामकृष्ण हरी’ वाली’: आव्हाड

## रोहित पवार आणि आव्हाड यांच्यात उडालेले खटके

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाने शिर्डी येथे आयोजित केलेले शिबिर जितेंद्र आव्हाड यांच्या रामाबाबतच्या विधानामुळे बरेच गाजले. या विधानानंतर खुद्द पवार गटातील नेत्यांमधील विसंवाद चव्हाट्यावर आला. ज्यावर अजित पवार गटाने जोरदार टीका केली. जितेंद्र आव्हाड यांच्या विधानानंतर रोहित पवार यांनी केलेले ट्विट आव्हाड यांना चांगलेच बोचल्याचे दुसऱ्या दिवशी घेतलेले पत्रकार परिषदेत दिसले. रोहित पवार हे लहान असून ते आमदार म्हणून नवखे आहे, त्यांना मी फार महत्त्व देत नाही, इथपर्यंत आव्हाड यांनी आपला संताप व्यक्त केला होता.**



या विषयावर आता पवार गटाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी भूमिका मांडली आहे. टीव्ही ९ या वृत्तवाहिनीशी बोलत असताना त्यांनी आधी आव्हाड यांच्या रामाबाबतच्या वक्तव्यावर भाष्य केले. त्या म्हणाल्या, "‘मी ‘रामकृष्ण हरी’वाली आहे. माझ्या ओठात, मनात, हृदयात राम कृष्ण हरी आहेत. माझ्यावर संत परंपरा आणि वारकरी संप्रदायाचे संस्कार आहेत. त्याच्यामुळे अनेकवेळा जेव्हा असे हल्ले होतात, तेव्हा आपण गप्प बसायचे असते. गप्प बसण्यात मोठी ताकद होते. जितेंद्र आव्हाड यांनी त्याच्यावर त्यांचे मत स्पष्ट केले आहे. कुणाला वाईट वाटले असेल, तर आपण सर्वांनीच सगळ्यांच्या भावनांचा मान-सन्मान ठेवला पाहीजे.” जितेंद्र आव्हाड यांच्या रामाबाबतच्या वक्तव्यानंतर रोहित पवार यांनी एक्स या साईटवरून पोस्ट टाकून त्यांना देव-धर्मावर न बोलण्याचा सल्ला दिला होता. मात्र आव्हाड यांना हा सल्ला रुचला नाही. त्यामुळे दुसऱ्या दिवशी खेद व्यक्त करण्यासाठी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी रोहित पवारांचा सल्ला झिडकारून लावत त्यांच्या बोलण्याला महत्त्व देत नसल्याचे म्हटले. तसेच अबू धाबीत बसून पोस्ट टाकणे सोपे असते, असा चिमटाही आव्हाड यांनी रोहित पवारांना काढला होता. यावर प्रतिक्रिया देताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की,“जितेंद्र आव्हाड वयाने रोहितपेक्षा मोठे आहेत. माझ्यापेक्षाही मोठे आहेत. आपल्यापेक्षा वयाने मोठे असलेल्यांनी आपल्याला सल्ला दिला असेल तर त्यात गैर काय? याच्यात काहीच चूक वाटत नाही. मोठ्यांचा सल्ला आणि आशीर्वाद घेणे, ही आपली संस्कृती आहे. जितेंद्र आव्हाड यांनी रोहितला जर सल्ला दिला असेल तर त्यात मला काही विशेष वाटत नाही. कारण मी सुसंस्कृत, स्वाभिमानी, भारतीय आणि मराठी मुलगी आहे. त्यामुळे ज्येष्ठांचे आदर आणि लहानांना प्रेम देणे, ही माझी संस्कृती आहे.” जितेंद्र आव्हाड आणि रोहित पवार यांच्या खटके उडाल्यानंतर अजित पवार गटाचे नेते आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी म्हटले होते की, ही तर आता वादाची सुरुवात आहे. पुढे अनेक वाद होतील. याबाबतचा प्रश्न सुप्रिया सुळे यांना विचारला असता त्या म्हणाल्या की, तटकरे यांचे हे वैयक्तिक मत आहे. लोकशाही आहे, त्यामुळे त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. तर छगन भुजबळ म्हणाले होते की, अतिशहाणा त्याचा बैल रिकामा. शरद पवार यांचा गट संपविण्यासाठी कुठल्याही बाहेरच्या लोकांची गरज नाही. त्यांचेच लोक पुरेसे आहेत. याबद्दलही सुप्रिया सुळे यांची प्रतिक्रिया विचारली असता त्या म्हणाल्या, माननीय भुजबळ साहेब जवळपास माझ्या वडीलांच्या वयाच्या आहेत. भुजबळ साहेब आपल्यापेक्षा वयाने मोठे असलेल्या लोकांवर टीका करायची नसते, असे संस्कार माझ्यावर झालेले आहेत. त्यामुळे माझ्या वडीलांच्या वयाच्या भुजबळ साहेबांना बोलायचा अधिकार आहे. ते काही बोलले असतील तर त्यावर मला आक्षेप घ्यायचा नाही.

### आव्हाड वयाने रोहितपेक्षा मोठे

"‘मी ‘रामकृष्ण हरी’वाली आहे. माझ्या ओठात, मनात, हृदयात राम कृष्ण हरी आहेत. माझ्यावर संत परंपरा आणि वारकरी संप्रदायाचे संस्कार आहेत. त्याच्यामुळे अनेकवेळा जेव्हा असे हल्ले होतात, तेव्हा आपण गप्प बसायचे असते. गप्प बसण्यात मोठी ताकद होते. जितेंद्र आव्हाड यांनी त्याच्यावर त्यांचे मत स्पष्ट केले आहे. कुणाला वाईट वाटले असेल, तर आपण सर्वांनीच सगळ्यांच्या भावनांचा मान-सन्मान ठेवला पाहीजे.” जितेंद्र आव्हाड यांच्या रामाबाबतच्या वक्तव्यानंतर रोहित पवार यांनी एक्स या साईटवरून पोस्ट टाकून त्यांना देव-धर्मावर न बोलण्याचा सल्ला दिला होता. मात्र आव्हाड यांना हा सल्ला रुचला नाही. त्यामुळे दुसऱ्या दिवशी खेद व्यक्त करण्यासाठी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी रोहित पवारांचा सल्ला झिडकारून लावत त्यांच्या बोलण्याला महत्त्व देत नसल्याचे म्हटले. तसेच अबू धाबीत बसून पोस्ट टाकणे सोपे असते, असा चिमटाही आव्हाड यांनी रोहित पवारांना काढला होता. यावर प्रतिक्रिया देताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की,“जितेंद्र आव्हाड वयाने रोहितपेक्षा मोठे आहेत. माझ्यापेक्षाही मोठे आहेत. आपल्यापेक्षा वयाने मोठे असलेल्यांनी आपल्याला सल्ला दिला असेल तर त्यात गैर काय? याच्यात काहीच चूक वाटत नाही.

# ‘जितेंद्र आव्हाडांकडून अजित पवारांना मदत!

## ‘त्या’ विधानावरून सुधीर मुनगंटीवारांची मिश्किल टिप्पणी

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जितेंद्र आव्हाड यांनी श्रीराम यांच्या आहाराबाबत भाष्य केल्यानंतर त्यावर सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या खुमासदार शैलीत उत्तर दिले. जितेंद्र आव्हाड यांची भाषा घसरत चालली आहे. त्यामुळे त्यावर अधिक काय बोलायचे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पण त्यांच्या अशा बोलण्याने ‘अंदर की बात है, आव्हाड अजितदादा के साथ है’, हे मात्र सिद्ध होत आहे.**

पवार साहेबांसह राहून अशी भाषा वापरून जे त्यांच्या गटात जे काही दोन-चार लोक राहिले आहेत, त्यांनाही संपविण्याचा प्रयत्न ते करत आहेत, अशी टीका मुनगंटीवार यांनी केली. हा रामभक्तांचा देश आहे. बरं झालं आव्हाड अजून बाथरुमपर्यंत आलेले नाहीत, अशीही प्रतिक्रिया देत मुनगंटीवार यांनी आव्हाड यांना टोला लगावला. नागपूर येथे माध्यमांशी बोलत असताना मुनगंटीवार यांनी विविध विषयांबाबत चौफेर फटकेबाजी केली. अयोध्येत निर्माणाधीन असलेल्या राम मंदिराचे २२ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होत आहे. याच दिवशी श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार



आहे. यासाठी देशभरातून हजारो लोकांना निमंत्रित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातूनही काही लोकांना निमंत्रित करण्यात आले आहे. तसेच निमंत्रणाच्या मानपानावरून टीका-टिप्पणीही झालेली पाहायला मिळाली. भाजपाचे किती आमदार या सोहळ्यासाठी जाणार? असा प्रश्न कॅबिनेट मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना विचारण्यात आला होता. २२ जानेवारी रोजी कोणताही आमदार अयोध्येत जाणार नाही. २५ जानेवारी नंतर अयोध्येत जाता येणार आहे, असे ते म्हणाले. सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले की, २५ जानेवारी नंतर एखाद्या जिल्ह्यातून भाविकांनी मागणी केल्यास विशेष रेल्वे उपलब्ध करून दिली जाईल. पण त्यासाठी आगाऊ पैसे रेल्वेला द्यावे लागतील. हा देश राम भक्तांचा आहे. त्यामुळे वेळ मिळेल, तसे प्रत्येकजण अयोध्येत जाईलच. त्यावर आताच कधी जाणार अशी चर्चा करण्यात काही अर्थ नाही. राम मंदिराला जितके दरवाजे आहेत, त्याचे लाकूड चंद्रपूरातून गेलेले आहे. जगातील कोणताही भक्त त्या दरवाजातून जाईल, तेव्हा त्याला चंद्रपूरच्याच लाकडाचा दरवाजा ओलांडावा लागेल, असेही मुनगंटीवार म्हणाले.

### दिल्लीत थंडी माझ्याकडे स्वेटर नाही

आगामी लोकसभेसाठी काही आमदारांना निवडणुकीत उतरविण्याची चर्चा आहे. सुधीर मुनगंटीवार यांच्या नावाचा विचार होत असल्याबाबतचा प्रश्न माध्यमांनी विचारला असता मुनगंटीवार यांनी मिश्किल शैलीत उत्तर दिले. ते म्हणाले, आमच्या पक्षातील बातम्या आम्हाला कळण्याऐवजी माध्यमांना कशा कळतात? पण यात काही तथ्य नाही. मी महाराष्ट्रातच राहणार आहे. यावर पत्रकार म्हणाले की, तुम्हाला दिल्लीत जाण्यात रस दिसत नाही. त्यावर मुनगंटीवार म्हणाले की, तिथे थंडी खूप असते आणि माझ्याकडे स्वेटर नाही.

# एससीएलएससी मध्ये कुणाचा समावेश

## सर्वोच्च न्यायालयाची कायदेशीर मदत सेवा समिती काय?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाचे न्या. बी. आर. गवई यांची सर्वोच्च न्यायायल कायदेशीर मदत सेवा समितीच्या (एससीएलएससी) अध्यक्षपदी नियुक्ती केली. सरन्यायाधीशानंतर सर्वात ज्येष्ठ असलेले न्या. संजीव खन्ना हे यापूर्वी समितीचे अद्यक्ष म्हणून काम पाहत होते. या संदर्भातील रितसर अध्यादेश अलीकडेच २९ डिसेंबर २०२३ रोजी विधि व न्याय मंत्रालयातर्फे जारी करण्यात आला. .**

सर्वोच्च न्यायालयात दाखल खटल्यांच्या संदर्भात समाजातील मागासांना सक्षम आणि मोफत कायदेशीर सेवा उपलब्ध करून देण्याची तरतूद लीगल सर्व्हिसेस ऑथोरिटीस ॲक्ट, १९८७ मध्ये करण्यात आली आहे. या कायद्याच्या कलम ३ए अंतर्गत त्या मदतीसाठीच ही समिती स्थापण्यात आली आहे. प्रस्तुत कायद्याच्या कलम ३ए मध्ये नमूद करण्यात आले आहे की, केंद्रीय प्राधिकरणाने (द नॅशनल लीगल सर्व्हिसेस ऑथऑरिटी किंवा नाल्सा) समितीची स्थापना करावी. केंद्राने निर्गमित केलेल्या निकषांच्या अधिन राहून सर्वोच्च न्यायालयातील विद्यमान न्यायमूर्तींची नियुक्ती अध्यक्ष म्हणून करणे आणि त्याचबरोबर अर्हता आणि अनुभव दोन्ही असलेल्या समिती सदस्यांची नियुक्ती करणे या कायद्यात अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे समितीच्या सचिवाचीही नियुक्ती सरन्यायाधीशांकडून केली जाते. सध्या तरी सरन्यायाधींशानी न्या. बी. आर. गवई यांची अध्यक्षपदी तर इतर नऊ जणांची निवड सदस्य म्हणून केली आहे. केंद्राने निर्गमित केलेल्या आदेशांनुसार सरन्यायाधीशांशी सल्लामसलत करून समिती त्यांच्या कामकाजासाठी इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करू शकते. नाल्सा अधिनियम, १९९५ अंतर्गत नियम १० नुसार एससीएलएससीच्या सदस्यत्वासाठी किती जण पात्र आहेत त्याची संख्या निश्चित करण्यात आली असून पात्रतेच्या



निकषांमध्ये अनुभव आणि अर्हता या दोन्हींचा समावेश करण्यात आला आहे. कायद्यातील तरतुदीनुसार काम करणे शक्य व्हावे यासाठी सरन्यायाधीशांच्या सल्ल्याने अधिनियमांमध्ये बदल करण्याचे अधिकार केंद्र सरकारला देण्यात आले आहेत. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेदांमध्ये कायदेशीर सेवेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. अनुच्छेद ३९ (ए) मध्ये म्हटले आहे, “आर्थिक अथवा इतर कोणत्याही कारणाने न्याय मिळविण्यासाठीची संधी कोणत्याही नागरिकाला नाकारली जाणार नाही हे काटेकोरपणे पाहण्यासाठी आणि न्याय देणाऱ्या व्यवस्थेचा प्रसार व्हावा या हेतूने राज्याने समन्याय आणि समान संधी तत्त्वाच्या आधारे व्यवस्था अस्तित्वात आणावी, ज्या आधारे अथवा योजनेद्वारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने मोफत कायदेशीर मदत उपलब्ध होईल.” राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ (समानतेचा अधिकार) आणि २२(१) (अटकेनंतर त्या संदर्भातील माहिती दिली जाण्यासंदर्भातील अधिकार ) या दोन्हींतर्गत समान संधीच्या तत्त्वावर समान न्याय मिळवून देणारी यंत्रणा उभी करणे हे राज्यांसाठी बंधनकारक आहे. १९५० साली सर्वप्रथम कायदेशीर मदतीच्या संदर्भातील संकल्पना मांडण्यात आली. मात्र प्रत्यक्षात १९८० साली सर्वोच्च न्यायालयाचे न्या. पी. एन. भगवती यांच्या नेतृत्त्वाखाली त्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर कायदेशीर मदतींच्या योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या समितीमार्फत संपूर्ण देशभरातील कायदेशीर मदतीच्या प्रकरणांवर लक्ष ठेवण्याचे काम सुरू झाले. कायदेशीर मदत आणि सहकार्यासाठी असलेल्या विविध योजनांसाठी लागणार निधी राज्य कायदेशीर मदत केंद्र वा प्राधिकरण यांना त्याचप्रमाणे विविध स्वयंसेवी संस्थांना देऊन जबाबदारी पार पाडण्याची भूमिकाही यात अंतर्भूत आहे. त्याचप्रमाणे, नाल्साची धेय्यधोरणे राबविण्यासाठी वा त्यांच्या निर्देशांची अंमलबजावणी करणे, नागरिकांना मोफत कायदेशीर मदत पुरविणे, लोक अदालत घेणे आदींसाठी प्रत्येक राज्यात राज्य कायदेशीर मदत सेवा प्राधिकरण (एसएलएसए) स्थापन केले जाते. प्रत्येक राज्यातील एसएलएसएचे नेतृत्त्व त्या त्या राज्याच्या मुख्य न्यायाधीशांकडे असते आणि समितीमध्ये कार्यकारी अध्यक्ष म्हणून वरिष्ठ न्यायमूर्तींचा समावेश केला जातो.

### सेवा प्राधिकार कायदा सुधारित

» कायदेशीर मदतीच्या योजनेला एका स्थायी स्वरूप देण्यासाठी १९८७ साली कायदेशीर मदत सेवा प्राधिकार कायदा सुधारित करण्यात आला. पात्र असलेल्या महिला, लहान मुले, अपंग, अनुसूचित जाती- जमाती, आर्थिकदृष्ट्या मागास, औद्योगिक कामगार आणि इतरांना मोफत आणि सुयोग्य मदत करणे हा त्यामागचा प्रमुख हेतू होता. या कायद्यांतर्गत नाल्साची स्थापना १९९५ साली कायदेशीर मदतीच्या प्रकल्पांची अंमलबजावणी आणि त्यासंदर्भातील कायदेशर धेय्यधोरणे निश्चित करण्याच्या उद्देशाने करण्यात आली. कायदेशीर मदत आणि सहकार्य यासाठी त्या अंतर्गत संपूर्ण देशभर कार्यालयांचे जाळे उभारण्यात आले.

# ईडीच्या पथकावर बंगालमध्ये हल्ला

## राज्यपालांनी याचा निषेध व्यक्त केला

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पश्चिम बंगालमध्ये ईडी अधिकाऱ्यांच्या पथकावर हल्ला झाल्यानंतर राज्यपाल सीव्ही आनंद बोस यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. हा हल्ला अतिशय निंदनीय असून राज्य सरकारला असे हल्ले थांबवावे लागतील. यानंतर राज्यपालांनी गृह सचिव आणि राज्याचे पोलिस महासंचालक यांना राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास बजावले. सीव्ही आनंद बोस म्हणाले, “जर सरकार आपल्या मूलभूत कर्तव्यापासून परावृत्त होत असेल तर संविधान आपले काम करेल.**

पश्चिम बंगाल बनाना रिपब्लिक नाही. राज्य सरकारने



लोकशाहीमधील रानटीपणा आणि गुंडगिरी थांबवायला हवी. सदर घटनेवर संताप व्यक्त करताना राज्यपाल म्हणाले, “ही एक भयंकर घटना असून चिंताजनक आणि खेदजनक अशी आहे. लोकशाहीत जर रानटीपणा आणि विध्वंसक वृत्ती फोफावत असेल तर त्याला आळा घालणे हे सरकारचे कर्तव्य आहे. जर सरकार आपल्या मूलभूत कर्तव्यात कसूर करत असेल तर संविधान आपला मार्ग स्वीकारेल. कारवाई करण्यासाठी माझ्याकडे असलेले सर्व घटनात्मक पर्याय खुले आहेत. निवडणुकीपूर्वी होणारा हिंसाचार ताबडतोब संपायला हवा.” पश्चिम बंगालमध्ये झालेल्या रेशन वितरण घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी ईडीचे पथक तृणमूल काँग्रेसचे नेते शेख शाहजहाँ यांच्या उत्तर २४ परगना जिल्ह्यातील निवासस्थानी छापा टाकण्यासाठी जात होते. यावेळी रस्त्यातच ईडीच्या पथकावर हल्ला केला. अधिकाऱ्यांच्या वाहनांची तोडफोड करण्यात आली. शाहजहाँच्या समर्थकांनी ही तोडफोड केली असल्याची टीका भाजपाकडून केली जात आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, ईडीचे अधिकारी सकाळी शेख यांच्या निवासस्थानी जायला निघाले होते. तेव्हा तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने ईडीच्या आणि केंद्रीय सुरक्षा दलाच्या ताफ्याला घेरले. यावेळी त्यांनी ईडीच्या विरोधात घोषणाबाजी करत वाहनांवर हल्ला केला. ईडीच्या पथकाने निघून जावे, यासाठी गर्दीने दबाव टाकला होता. हल्ला झाल्यानंतर ईडीच्या पथकाने आपली वाहने तिथेच सोडून मिळेल त्या मार्गाने तिथून पळ काढला. ईडीच्या एका अधिकाऱ्याने पीटीआयशी बोलताना सांगितले की, असा हल्ला होणे, आम्हाला अपेक्षित नव्हते. आमच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळावरून तात्काळ पळ काढला. केंद्रीय सुरक्षा दलावरही यावेळी हल्ला झाला.

# अदाणी आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

उद्योजक मुकेश अंबानी यांना मागे टाकून उद्योगपती गौतम अदाणी हे आता क्रमांक एकचे व्यक्ती झाले आहेत. भारत आणि आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत गौतम अदाणींचा समावेश झाला आहे. जगातील अब्जाधीशांच्या यादीतही गौतम अदाणी यांनी मोठी झेप घेतली आहे. जगातल्या अब्जाधीशांच्या यादीत गौतम अदाणी १२ व्या स्थानावर पोहचले आहेत. तर मुकेश अंबानी हे जगातील अब्जाधीशांच्या यादीत १२ व्या स्थानावरुन १३ व्या स्थानावर पोहचले आहेत. ब्लूमबर्ग बिलियनर्स इंडेक्सनुसार, मुकेश अंबानींची संपत्ती ९७ अब्ज डॉलर्स आहे. गेल्या २४ तासांत गौतम अदाणी यांची एकूण संपत्तीत मोठी भर पडली आहे. अदाणी समूहाचे मालक असलेले गौतम अदाणी हे आता भारतातील श्रीमंत व्यक्तींच्या यादीत पहिल्या स्थानावर तर जगातील अब्जाधीशांच्या यादीत १२ व्या स्थानावर पोहचले आहेत. गुरुवारपर्यंत अदाणी या यादीत १४ व्या क्रमांकावर होते. मात्र गेल्या २४ तासांत त्यांनी केलेल्या प्रचंड कमाईमुळे त्याच्या नेट वर्थमध्ये चांगली वाढ झाली आहे. ज्यामुळे ते आता १४ व्या स्थानावरून १२ व्या स्थानावर पोहोचले आहेत. ज्यानंतर गौतम अदाणी हे अदाणी समूहाच्या शेअर्समध्येही जोरदार वाढ दिसून आली आहे. BSE वर ACC सिमेंटचे शेअर्स ३.२० टक्क्यांनी वाढून २,३५२ रुपये प्रति शेअर झाले यासह अदाणी पोर्ट सुमारे ३ टक्के, अदाणी पॉवर २ टक्के, अदाणी टोटल गॅस २ टक्के, अदाणी विल्मर शेअर ०.१२ टक्के, अंबुजा सुमारे ३ टक्क्यांनी वाढले.

## सालारच्या कमाईत घसरण

भिनेता प्रभासचा (PRABHAS) 'सालार' (SALAAR) हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. 'सालार' या चित्रपटानं रिलीजच्या पहिल्या आठवड्यात बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली. अशातच सालार या चित्रपटाच्या कमाईत दुसऱ्या आठवड्यात घसरण झाली आहे. 'सालार' या चित्रपटानं रिलीजच्या 14 व्या दिवशी किती कमाई केली? हे जाणून घेऊयात... प्रभासच्या 'सालार' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर दोन आठवड्यांपासून राज्य करतोय. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. 'सालार' या चित्रपटानं रिलीजच्या पहिल्या आठवड्यात 308 कोटींची कमाई केली होती रिलीजच्या दुसऱ्या आठवड्यात सालार या चित्रपटाच्या कमाईत घसणार झाली आहे. 'सलार' या चित्रपटानं रिलीजच्या 8 व्या दिवशी 9.62 कोटी, 9 व्या दिवशी या चित्रपटानं 12.55 कोटी, 10व्या दिवशी 15.1 कोटी, 11व्या दिवशी 16.6 कोटी, 12व्या दिवशी 6.45 कोटी आणि 13व्या दिवशी 5.18 कोटी कमावले आहेत.

आता चित्रपटाच्या रिलीजच्या 14 व्या दिवसाच्या कमाईचे आकडे समोर आले आहेत. SACNILK च्या सुरुवातीच्या ट्रेंड रिपोर्ट्नुसार, 'सालार' ने रिलीजच्या दुसऱ्या गुरुवारी म्हणजेच 14 व्या दिवशी 4.50 कोटी रुपये कमवले आहेत. ट्रेंड ॲनेलिस्ट मनोबाला विजयबालन यांच्या मते, सालार या चित्रपटानं 13 दिवसांत जगभरात 650 कोटींची कमाई केली आहे. 'सालार' हा चित्रपट खानसार या काल्पनिक शहरावर आधारित आहे. ही कथा प्रभास आणि सुकुमारन यांनी साकारलेल्या देवा आणि वर्धा या पात्रांभोवती फिरतो. या चित्रपटात श्रुती हासन, ईश्वरी राव, जगपती बाबू आणि श्रिया रेड्डी यांच्यासह अनेक दिग्गज कलाकार आहेत. प्रशांत नील दिग्दर्शित हा चित्रपट 22 डिसेंबर 2023 रोजी तेलुगु, कन्नड, तमिळ, मल्याळम आणि हिंदीमध्ये प्रदर्शित झाला. 'सालार 2' हा सिनेमा 2025 मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## 'डिलिव्हरी बॉय' चा धमाकेदार टीझर रिलीज

मराठी चित्रपट विश्वामध्ये गेल्या काही दिवसांपासून एका चित्रपटानं प्रेक्षकांचे, चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यात प्रामुख्यानं उल्लेख करायचा झाल्यास डिलिव्हरी बॉयचे नाव घ्यावे लागेल. प्रथमेश परबची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाच्या टीझरनं प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. 'डिलिव्हरी बॉय' या चित्रपटाच्या घोषणेपासूनच प्रेक्षकांना या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांना उत्सुकता लागून राहिली होती. त्यात काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचे एक भन्नाट पोस्टर सोशल मीडियावर झळकले आणि आता प्रेक्षकांची उत्कंठा वाढवणारे एक धमाकेदार टीझरनं प्रेक्षकांना प्रतिक्रिया देण्यास भाग पाडले आहे. टीझरमध्ये प्रथमेश परब आणि पृथ्वीक प्रताप गावातील काही महिलांना 'सरोगसी'साठी तयार करताना दिसत असून यातून होणारा कल्लोळ आपल्याला चित्रपटात दिसणार आहे.आता हे दोघे गावातील महिलांना सरोगसीसाठी का तयार करत आहेत, याचे उत्तर मात्र प्रेक्षकांना लवकरच मिळणार आहे. या चित्रपटात प्रथमेश आणि पृथ्वीक बरोबर अंकिता लांडेही पाटीलही प्रमुख भूमिकेत आहे. 'डिलिव्हरी बॉय'मधून प्रथमेश परब एका वेगळ्याच लूकमध्ये प्रेक्षकांसमोर येणार असून त्याचा हा नवा अंदाज चाहत्यांना नक्कीच आवडेल. हा चित्रपट सरोगसीवर भाष्य करणारा आहे, हे टीझरवरून कळतच आहे. आता हा नाद खुळा भाऊ आणि त्याचा जोडीदार गावातील महिलांना सरोगसीसाठी तयार करतो की आणखी अडचणी मागे लावून घेतो.

## जान्हवी पोहोचली तिरुपतीला



बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री जान्हवी कपूर (JANHVI KAPOOR) ही गेल्या काही दिवसांपासून तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. जान्हवी आणि शिखर पहाडिया (SHIKHAR PAHARIYA) यांच्या डेटिंगची चर्चा सोशल मीडियावर होत आहे. करण जोहरच्या कॉफी विथ करण 8 या शोमध्ये जान्हवी शिखरबद्दल भरभरुन बोलली. डेटिंगच्या चर्चेदरम्यान आता जान्हवी कपूर शिखर पहाडियासोबत श्री वेंकटेश्वर स्वामी मंदिर येथे दर्शनासाठी गेली आहे. जान्हवी आणि शिखरचा मंदिरात जातानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ANI च्या ट्विटर अकाऊंटवर जान्हवी आणि शिखर या दोघांचा एक व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये दोघेही ट्रेडिशनल लूकमध्ये दिसत आहेत. जान्हवी ही गोल्डन कलरची साडी आणि गोल्डन स्टोनची ज्वेलरी अशा लूकमध्ये दिसत आहे तर शिखर पांढऱ्या धोती-कुर्त्यामध्ये दिसत आहे. त्याचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल होत आहेत. जान्हवीनं तिचे तिरुपती येथील काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले. या फोटोला तिनं कॅप्शन दिलं, "आणि आता 2024 सुरू झाल्यासारखे वाटते. गोविंदा गोविंदा!" जान्हवीच्या या फोटोवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे.

## कंगनानं केलं'12 वी फेल'चं कौतुक

गेल्या वर्षी अभिनेता विक्रांत मेस्सीचा (VIKRANT MASSEY) 12 वी फेल (12TH FAIL) हा चित्रपट थिएटरमध्ये रिलीज झाला. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर कोट्यवधींची कमाई केली. बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातल्यानंतर हा चित्रपट ओटीटीवर रिलीज झाला. या चित्रपटाचं अनेक जण कौतुक करत आहेत. आता अभिनेत्री कंगना रानौतनेही (KANGANA RANAUT) '12वी फेल' या चित्रपटाचं आणि या चित्रपटामधील अभिनेता विक्रांत मेस्सीचं कौतुक केलं आहे. कंगनानं सोशल मीडियावरील पोस्टमध्ये विक्रांतची तुलना दिवंगत अभिनेता इरफान खानशी केली आहे. कंगनानं सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये लिहिलं, "हा खूप अप्रतिम चित्रपट आहे. ग्रामीण खेडेगावातून हिंदी माध्यमातील शिक्षण घेतलं असल्यामुळे आणि शालेय वर्षात आरक्षणाशिवाय प्रवेश परीक्षेसाठी बसलेली विद्यार्थी असल्याने, मी संपूर्ण चित्रपट बघताना रडत होते. मी विमानात हा चित्रपट पाहिला आणि विमानात मी कधीच एवढी रडले नाही. माझे सहप्रवासी माझ्याकडे काळजीने बघत होते." कंगनानं इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करुन '12 वी फेल' या चित्रपटातील अभिनेता विक्रांतची तुलना दिवंगत अभिनेता इरफान खानशी केली आहे.तिनं पोस्टमध्ये लिहिलं, 'विधू सरांनी पुन्हा एकदा माझे मन जिंकले आहे. विक्रांत तू आश्चर्यकारक आहे ! त्याच्या आगामी काळात तो इरफान खान साहेबांच्या उणिवा पूर्ण करू शकेल.तुझ्या टॅलेंटला माझा सलाम' 2021 मध्ये कंगनाने विक्रांतला 'झुरळ' असे म्हटले होते. अभिनेत्री यामी गौतमनं तिचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले होते. या फोटोला विक्रांतने कमेंट केली," राधे माँ सारखी शुद्ध आणि पवित्र" विक्रांतच्या या कमेंटला कंगनानं रिप्लाय दिला, "कहां से निकला ये कॉकरोच. लाओ मेरी चप्पल" '12वी फेल' या चित्रपटाचे दिग्दर्शन विधू विनोद चोप्रा यांनी केले आहे. हॉटस्टार या ओटीटी प्लॅटफॉर्मवर हा चित्रपट रिलीज झाला आहे. हा चित्रपट मनोज कुमार शर्मा यांच्या यांच्या जीवनावर आधारित आहे.

## सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम



नृत्यांगणा गौतमी पाटील (GAUTAMI PATIL) ही तिच्या अदांनी आणि नृत्यांनी चात्यांना घायाळ करत असते. गौतमी वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये तिची नृत्यशैली सादर करते. कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे गौतमी चर्चेत असते. आता गौतमीनं सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये ती "सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम" (SARKAR TUMHI KELAY MARKET JAM) या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. गौतमीचा हा व्हिडीओ पाहिल्यानंतर मात्र आता नेटकरी तिच्यावर भडकले आहेत. गौतमीच्या व्हिडीओला कमेंट करुन अनेकांनी तिला ट्रोल देखील केलं आहे. गौतमीनं इन्स्टाग्रामवर तिचा "सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम" या गाण्यावरील डान्सचा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये गौतमी ही स्टेजवर काही लहान मुलींसोबत डान्स करताना दिसत आहे. लहान मुलींसोबत डान्स केल्यानंतर काही नेटकरी गौतमीला ट्रोल करत आहेत. एका नेटकऱ्यानं गौतमीला कमेंट केली, "तू नाच आणि अजून तुझ्या पुढे 10 तयार कर नाचायला. काय माय जरातर लाजावं की. देशाच भविष्य नाचवताना." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "लहान मुली आहेत एवढी तरी आकल ठेवा" काही नेटकऱ्यांनी गौतमीच्या व्हिडीओला कमेंट करुन तिला ट्रोल केलं तर काहींनी तिच्या नृत्यशैलीचं कौतुक देखील केलं. गौतमीच्या माझा कारभार सोपा नसतोय रं, दिलाचं पाखरू, सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम,पाटलांचा बैलगाडा या गाण्यांना प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. तिच्या गाण्यांवर नेटकरी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करतात. गौतमी तिच्या गाण्यांचे व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत असते. तिला इन्स्टाग्रामवर 1.5 मिलियन फॉलोवर्स आहेत. काही दिवसांपूर्वी गौतमीचं 'घोटाळा झाला' हे गाणं BEING FILMY CREATIONS या युट्यूब चॅनलवर शेअर करण्यात आलं आहे. या गाण्याला देखील नेटकऱ्यांची पसंती मिळाली. तसेच तिचा 'घुंगरु' हा चित्रपट देखील रिलीज झाला.या चित्रपटाचं दिग्दर्शन बाबा गायकवाड (BABA GAIKWAD) यांनी केलं आहे.नृत्यांगणा गौतमी पाटील (GAUTAMI PATIL) ही तिच्या अदांनी आणि नृत्यांनी चात्यांना घायाळ करत असते. गौतमी वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये तिची नृत्यशैली सादर करते. कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे गौतमी चर्चेत असते. आता गौतमीनं सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये ती "सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम" (SARKAR TUMHI KELAY MARKET JAM) या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे.

# रोहित अन् कोहली खेळणार?

## दोघांनी टी-20 वर्ल्ड कप खेळण्याची इच्छा व्यक्त केली

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (BCCI) आज (5 जानेवारी) अफगाणिस्तानविरुद्धच्या T20 मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा करू शकते. ही मालिका 11 जानेवारीपासून सुरू होणार आहे. वृत्तानुसार, या मालिकेमुळे रोहित शर्मा आणि विराट कोहलीचे T-20 संघात पुनरागमन होणार आहे.अफगाणिस्तानचा संघ तीन सामन्यांच्या टी-20 मालिकेसाठी भारत दौऱ्यावर येणार आहे. या मालिकेतील पहिला टी-20 सामना 11 जानेवारीला मोहालीत खेळवला जाणार आहे. दुसरा T-20 इंदूरमध्ये 14 जानेवारीला आणि तिसरा आणि शेवटचा T-20 17 जानेवारीला बंगळूरमध्ये खेळवला जाईल.**



किंग विराट कोहली आणि नियमित कर्णधार रोहित शर्मा यांनी स्वतःला T20 फॉरमॅटसाठी उपलब्ध घोषित केले आहे. रिपोर्टनुसार, कोहली आणि रोहितने टी-20 वर्ल्ड कप खेळण्याची इच्छा व्यक्त केली आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-20 मालिकेत वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांना विश्रांती देण्यात येईल, असा दावा मीडिया रिपोर्ट्समध्ये केला जात आहे. तर मोहम्मद शमी देखील या मालिकेत टीम इंडियाचा भाग असणार नाही. रोहित शर्माच्या अनुपस्थितीत टीम इंडियाची कमान सांभाळणारे सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पांड्या दुखापतींमुळे अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-20 मालिकेत टीम इंडियाचा भाग असणार नाहीत. इशान किशन, ऋतुराज गायकवाड, तिलक वर्मा, जितेश शर्मा, मुकेश कुमार, अक्षर पटेल, रवी बिश्नोई, आवेश खान, अर्शदीप सिंग आणि वॉशिंग्टन सुंदर या खेळाडूंना अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-20 मालिकेत स्थान मिळू शकते. मात्र, काही खेळाडूंच्या दुखापतीमुळे काही नवे चेहरेही संघात सामील होऊ शकतात. मात्र, विराट कोहली आणि रोहित शर्मा टी-20 संघात पुनरागमन करतात की नाही हे पाहणे औत्सुक्याचं आहे. आयसीसीने टी-२० विश्वचषक २०२४ या स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. ही स्पर्धा १ ते २९ जून दरम्यान २० संघांमध्ये होणार आहे. २९ जून रोजी बार्बाडोस येथे अंतिम सामना होणार आहे. भारताचा पहिला सामना ५ जून रोजी आयर्लंडशी होणार आहे. तर भारत- पाकिस्तान सामना ९ जून रोजी होणार आहे. भारताचा तिसरा सामना १२ जूनला अमेरिकेसोबत आणि चौथा सामना १५ जूनला कॅनडाशी होईल. वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत होणाऱ्या या स्पर्धेत एकूण २० संघ सहभागी होणार आहेत. सर्व संघांची प्रत्येकी पाच संघांच्या चार गटात विभागणी करण्यात आली आहे. भारताला अ गटात पाकिस्तान, आयर्लंड, कॅनडा आणि यूएसए सोबत ठेवण्यात आले आहे. लीग स्टेज: पहिला टप्पा १ ते १८ जून दरम्यान खेळला जाईल. प्रत्येक गटातील संघ आपापसात एक-एक सामना खेळतील. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ पुढील टप्प्यासाठी पात्र ठरतील. सुपर-8: दुसरा टप्पा १९ ते २४ जून दरम्यान खेळवला जाईल. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ येथे सहभागी होतील. एकूण आठ संघ प्रत्येकी एक सामना खेळणार आहेत. येथून अव्वल चार संघ नॉकआऊट फेरीत पोहोचतील. नॉकआऊट: जे संघ सुपर-8 मध्ये चांगली कामगिरी करतील ते उपांत्य फेरीत प्रवेश करतील. पहिला उपांत्य फेरीचा सामना २६ जूनला, तर दुसरा उपांत्य फेरीचा सामना २७ जूनला होणार आहे. टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेचे आयोजन अमेरिकेतील तीन आणि वेस्ट इंडिजमधील सहा मैदानांवर होणार आहे. २० पैकी दहा संघ यूएसमध्ये २९ दिवसांच्या स्पर्धेतील त्यांचे पहिले सामने खेळतील, १६ सामने लॉडरहिल, डॅलस आणि न्यूयॉर्क येथे होतील. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील ब्लॉकबस्टर सामना ९ जून रोजी लॉंग आयलंडमधील न्यू नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे.

### या दिवशी भारत-पाकिस्तान भिडणार

भारतीय संघाला अ गटात आयर्लंड, पाकिस्तान, अमेरिका आणि कॅनडासोबत ठेवण्यात आले आहे. भारतीय संघाचे पहिले तीन गट सामने न्यूयॉर्कमध्ये होणार आहेत. भारतीय संघ 5 जून रोजी आयर्लंडविरुद्ध पहिला सामना खेळणार आहे. दुसरा सामना 9 जून रोजी पाकिस्तानशी होणार आहे. तर भारतीय संघ 12 जून रोजी अमेरिकेविरुद्ध तिसरा गट सामना खेळणार आहे. भारताचा शेवटचा गट सामना 15 जून रोजी कॅनडाविरुद्ध होणार आहे. आगामी T20 विश्वचषक 1 जून ते 29 जून दरम्यान वेस्ट इंडिज आणि यूएसएमध्ये खेळवला जाणार आहे. 20 संघांची ही स्पर्धा बाद फेरीसह एकूण 3 टप्प्यात खेळवली जाईल. सर्व 20 संघ प्रत्येकी 5 च्या 4 गटात विभागले जातील. प्रत्येक गटातील टॉप-2 संघ सुपर-8 मध्ये प्रवेश करतील. यानंतर, सर्व 8 संघ प्रत्येकी 4 च्या 2 गटात विभागले जातील. सुपर-8 टप्प्यात दोन्ही गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील. दोन संघ उपांत्य फेरीच्या दोन सामन्यांद्वारे अंतिम फेरीत प्रवेश करतील.

# 29 वर्षानंतर सोलापुरात रणजी सामन्याचा थरार

## 1994 मध्ये झालेल्या सामन्यात काय झालं होतं?

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**सोलापुरात तब्बल 29 वर्षानंतर रणजी सामना होतोय. सोलापुरातल्या इंदिरा गांधी स्टेडीयमवर (SOLAPUR CRICKET STADIUM) महाराष्ट्र विरुद्ध माणिपूर हा सामना खेळवला जात आहे. जवळपास तीन दशकानंतर सोलापूरच्या क्रिडांगणावर क्रिकेट सामना होत असल्याने सोलापूरकरामध्ये उत्साह पाहायला मिळाला. सकाळी 10 वाजता ह्या सामान्याची सुरुवात झालीय.**

सोलापूर महानगरपालिका आणि स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सोलापुरातील इंदिरा गांधी स्टेडियम हे अत्याधुनिक करण्यात आले. मात्र रणजी सामना हा तब्बल 29 वर्षानी होतोय. त्यामुळे सोलापुरातील क्रिकेट प्रेमीसाठी ही पर्वणी मानली जातेय. हा सामना पाहण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने गर्दी करत खेळाडूंचा उत्साह वाढवला. केदार जाधव या स्टार खेळाडूला पाहण्यासाठी क्रीडाप्रेमींनी गर्दी केली आहे. सोलापुरातल्या इंदिरा गांधी स्टेडीयमला पार्क स्टेडियम असेही म्हटले जाते. 1972 मध्ये




सोलापुरातील हे मैदानाचा पुनर्विकास करण्यात आला. या मैदानावर आतापर्यंत लिस्ट ए क्रिकेटचे दहा सामने झाले आहेत. इंदिरा गांधी स्टेडियमची प्रेक्षक क्षमता 30 हजार इतकी आहे. न्यूझीलंडमध्ये असतात, त्यापद्धतीने हे मोकलं मैदान आहे. स्टँडला कोणतेही रुफ लावलेले नाहीत. देशाच्या चौथ्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नावाने या स्टेडियमचे नामकरण करण्यात आले. मणिपूरचा कर्णधाराने नाणेफेक जिंकन प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण त्याचा हा निर्णय महाराष्ट्राच्या गोलंदाजांनी फेल ठरवला. पहिल्या दिवशी मणिपूरचा डाव 137 धावांत संपुष्टात आला. मणिपूरकडून प्रज्योत सिंह याने सर्वाधिक धावा केल्या. प्रज्योतसिंह याने 45 धावांचे योगदान दिले. त्याशिवाय PRAFULLOMANI SINGH याने 33 धावा जोडल्या. महाराष्ट्राकडून हितेश वालुंज याने पाच विकेट घेतल्या. प्रदीप धडे याने चार विकेट घेतल्या. महाराष्ट्राचा कर्णधार केदार जाधव सोलापूरच्या मणिपूर आणि महाराष्ट्र यांच्यातील सामना पाहण्यासाठी सोलापूरमध्ये गर्दी झाली आहे. क्रिकेटप्रेमी सामन्याचा आनंद घेत आहेत.

### मांजरेकर मुंबईचे कर्णधार होते

मुंबई आणि महाराष्ट्र यांच्यात 1994 मध्ये अखेरचा सामना खेळवण्यात आला होता. त्यानंतर या स्टेडियमवर आता सामना होत आहे. 1994 मध्ये झालेल्या सामन्यात मुंबईने नाणेफेक जिंकली होती. संजय मांजरेकर मुंबईच्या संघाचे कर्णधार होते, त्यांनी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता.